# बृहन्मुंबई महानगरपालिका
## नगर अभियंता मध्यवर्ती कार्यालय
### क्र.नअ/12497/आसेप्र दि.15.10.2026

★ सूचना पत्र - 1 ★

नगर अभियंता खात्याच्या अधिपत्याखालील विविध खात्याच्या आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य/यांत्रिकी व विद्युत) व दुय्यम अभियंता (स्थापत्य/यांत्रिकी व विद्युत) या संवर्गातील सरळसेवा कोटयातील रिक्त पदे ऑनलाईन अर्ज मागवून, बहुपर्यायी वस्तुनिष्ठ ऑनलाईन पध्दतीने कनिष्ठ अभियंता (स्थापत्य/ यांत्रिकी व विद्युत) या पदांसाठी दि.02.03.2025, दि.03.03.2025 व दि.08.03.2025 रोजी ऑनलाईन परीक्षा घेण्यात आली.

कनिष्ठ अभियंता (स्थापत्य / यांत्रिकी व विद्युत) पदांकरीता पदवीधारक उमेदवारांनी मा. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेत दिलेल्या अंतरीम आदेशानुसार पदविकाधारक उमेदवारांसमवेत पदवीधारक उमेदवारांना कनिष्ठ अभियंता (स्थापत्य / यांत्रिकी व विद्युत) या पदांच्या ऑनलाईन परीक्षेत बसण्याची संधी देण्यात आली होती. मा. उच्च न्यायालयाकडून सदर न्यायालयीन प्रकरणी अंतिम सुनावणी न झाल्यामुळे, सदर संवर्गाचा निकाल राखून ठेवण्यात आलेला होता.

तथापि, मा. उच्च न्यायालयाच्या दि.29.09.2026 रोजीच्या आदेशान्वये कनिष्ठ अभियंता (स्थापत्य / यांत्रिकी व विद्युत) या संवर्गाच्या सरळसेवा भरतीच्या अनुषंगाने प्रलंबित ठेवण्यात आलेला फक्त पदविकाधारक उमेदवारांचाच निकाल दि.13.10.2026 रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला आहे.

**(श्री. रामचंद्र कदम)**
**नगर अभियंता**